सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# कार्यालय पोलीस आयुक्त,नागपूर शहर

पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड,सिव्हील लाईन्स, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2590601, फॅक्स क्र. 0712-2534716, ई-मेल-
cp.nagpur@mahapolice.gov.in

क्रमांक:पोआना/आस्था/सआली-५/पो.शि.चा-२१/२०२३- 121 नागपूर शहर दिनांक ११/०२/२०२३

प्रति,

पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(लक्षवेध:- संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई)

**विषय:-** पोलीस शिपाई चालक भरती-२०२१
लेखी चाचणीसाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या अतिम सुधारीत सुचीबाबत.
संदर्भ - या कार्यालयाचे पत्र समक्रमांक दि०४/०२/२०२३

-----oooo-----

सादर आहे की, या घटकाचे आस्थापनेवर सन-२०२१ मधील "**पोलीस शिपाई चालक**" या पदासाठी दिनांक ०४/०१/२०२३ ते ११/०१/२०२३ पर्यन्त शारिरीक चाचणी घेण्यात आली असुन शारिरीक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार यांची संबंधीत प्रवर्गामधील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदाच्या १:१० या प्रमाणात लेखी परीक्षेसाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची तात्पुरती यादी **पोलीस मुख्यालय, नागपूर शहर N.I.T हॉल नागपूर** येथील नोटीस बोर्डवर व पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे www.nagpurpolice.gov.in या संकेतस्थळावर तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दि.०४/०२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

दिनांक ०४/०२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीबाबत उमेदवारांकडून प्राप्त आक्षेप/हरकती विचारात घेवून पोलीस शिपाई चालक पदाच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची सुधारीत व अंतिम यादी उमेदवारांसाठी असलेल्या सुचनांच्या प्रतिसह यासोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

तरी पोलीस शिपाई चालक पदाच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची सुधारीत व अंतिम यादी महाराष्ट्र पोलीस दलाच्या https://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

**सहपत्र:-** लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची सुधारीत यादी
व उमेदवारांसाठी सुचनां

( डॉ.अश्विनी पाटील)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे करिता

प्रत

पोलीस निरीक्षक, सायबर गुन्हे शाखा, नागपुर शहर
२/- सोबत प्रसिध्दीपत्रक नागपुर शहर पोलीस आयुक्तालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

कार्यालय पोलीस आयुक्त,नागपूर शहर
पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड,सिव्हील लाईन्स, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712–2590601, फॅक्स क्र. 0712–2534716, ई-मेल- cp.nagpur@mahapolice.gov.in

क्रमांक:पोआना/आस्था/सआली-५/पो.शि.चा-२१/कौशल्य चा.अंतीम यादी /२०२३- 140नागपूर शहर दिनांक १०/०२/२०२३

# पोलीस शिपाई चालक भरती -२०२१

## उमेदवारांसाठी सुचना

पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर यांचे आस्थापनेवर रिक्त असलेल्या १२१ पोलीस शिपाई चालक पदासाठी दि. ०४/०१/२०२३ ते ११/०१/२०२३ पर्यन्त कागदपत्र पडताळणी, शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी घेण्यात आलेली आहे त्यामध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे महाराष्ट्र सहा. पोलीस उपनिरीक्षक, चालक पोलीस हवालदार, चालक पोलीस नाईक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश), नियम, २०१९ व नियम- २०२२ यामधील नियम ८ (अ) नुसार शारिरीक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार यांची संबंधीत प्रवर्गामधून जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदाच्या १:१० या प्रमाणात लेखी परीक्षेसाठी तात्पुरती निवड करण्यात आली आहे. सदरहु लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची तात्पुरती यादी **पोलीस मुख्यालय, नागपूर शहर N.I.T हॉल नागपूर** येथील नोटीस बोर्डवर व पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे www.nagpurpolice.gov.in या संकेतस्थळावर तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दि.०४/०२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

दिनांक ०४/०२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या यादीवर काही आक्षेप/हरकत असल्यास cp.nagpur.dcp.hq@mahapolice.gov.in यावर लेखी स्वरुपात ८४०७९६२९७९ या नंबर वरील व्हॉटसॲप क्रमांकावर किंवा प्रत्यक्षरित्यां पोलीस भवन, तिसरा माळा-समाधान कक्ष, नागपूर शहर येथे येउन दिनांक ०६/०२/२०२३ चे दुपारी १२:०० वा. पर्यत सविस्तर आक्षेप कारणासह नोंद करण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

तद्नंतर दिनांक ०४/०२/२०२३ रोजी पोलीस शिपाई चालक पदाच्या लेखी परिक्षेकरीता तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या यादी बाबत दिनांक ०६/०२/२०२३ चे दुपारी १२-०० वाजेपर्यन्त प्राप्त झालेले सर्व आक्षेप/हरकती विचारात घेवून पोलीस शिपाई चालक या पदाकरीता लेखी व कौशल्य चाचणी करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची **सुधारीत व अंतिम पात्रता** यादी **पोलीस मुख्यालय, नागपूर शहर N.I.T हॉल नागपूर** येथील नोटीस बोर्डवर व पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे www.nagpurpolice.gov.in या

संकेतस्थळावर तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे www.mahapolice.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणी करीता येणा-या उमेदवारां करीता सुचना.**

**(०१)** उमेदवारांनी वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीकरीता येताना शारिरीक चाचणी करीता निर्गमीत झालेल्या ऑनलाईन प्रवेशपत्राची प्रत, एल.एम.व्ही. (LMV) किंवा एल.एम.व्ही.-टिआर (LMV-TR) वाहन चालविण्याचा मुळ परवाना व त्यांची छायांकित प्रत, आधार कार्ड किंवा अन्य कोणतेही ओळखपत्र व दोन पासपोर्ट साईज फोटो सोबत आणावेत. सदरची कागदपत्रे सोबत न आणल्यास वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीकरीता प्रवेश दिला जाणार नाही.

**(०२)** उमेदवारांनी या सोबत संलग्न केलेल्या वेळापत्रका प्रमाणे दिलेल्या दिवशीच सकाळी ०७:४५ वाजता कौशल्य चाचणीच्या ठिकाणी हजर रहाणे बंधनकारक आहे. जे उमेदवार त्यांना वरिल प्रमाणे नेमुन दिलेल्या तारखेस व वेळेत उपस्थित राहणार नाही, त्या उमेदवारांना वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीसाठी तारीख बदलून देण्यात येणार नाही, याची सर्व उमेदवारांनी व्यक्तिश: नोंद घ्यावी.

**०३)** वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी एकूण ५० गुणांची व दोन प्रकारांची असणार आहे.

**अ)** हलके वाहन चालविण्याची चाचणी - २५ गुण.

**ब)** जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी - २५ गुण.

जे उमेदवार वाहन चालविण्याच्या दोन्ही कौशल्य चाचणीमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण घेउन उत्तीर्ण होतील, ते उमेदवार लेखी परीक्षेकरीता पात्र राहतील. तसेच **कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असुन कौशल्य चाचणीत मिळालेले गुण गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घेऊन एकुण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत, यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**सहपत्र:- उमेदवारांची वेळापत्रक यादी**

Asate

( डॉ.अश्विनी पाटील)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे करिता

प्रति,

पोलीस निरीक्षक, सायबर गुन्हे शाखा, नागपुर शहर

२/- त्यांनी वर नमुद प्रसिध्दीपत्रक नागपुर शहर पोलीस आयुक्तालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

# कार्यालय पोलीस आयुक्त,नागपूर शहर
## पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड,सिव्हील लाईन्स, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712–2590601, फॅक्स क्र. 0712–2534716, ई-मेल- cp.nagpur@mahapolice.gov.in

क्रमांक:पोआना/आस्था/सआली-५/पो.शि.चा-२१/कौशल्य चा.अंतीम यादी /२०२३- 141 नागपूर शहर दिनांक ११/०२/२०२३

## पोलीस शिपाई चालक भरती -२०२१

## वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीचे वेळापत्रक

| उमेदवारांची संख्या | वेळापत्रक (दिनांक वेळ व दिवस) |
|---|---|
| अनु. क्रमांक ००१ ते २५० वर नमुद उमेदवार | मंगळवार दिनांक- १४/०२/२०२३ चे सकाळी- ०७:४५ वा. |
| अनु. क्रमांक २५१ ते ५०० वर नमुद उमेदवार | बुधवार दिनांक- १५/०२/२०२३ चे सकाळी- ०७:४५ वा. |
| अनु. क्रमांक ५०१ ते ७७० वर नमुद उमेदवार | गुरुवार दिनांक- १६/०२/२०२३ चे सकाळी- ०७:४५ वा. |
| अनु. क्रमांक ७७१ ते १०४० वर नमुद उमेदवार | शुक्रवार दिनांक- १७/०२/२०२३ चे सकाळी- ०७:४५ वा. |
| अनु. क्रमांक १०४१ ते १३२० वर नमुद उमेदवार | शनिवार दिनांक- १८/०२/२०२३ चे सकाळी- ०७:४५ वा. |
| **दिनांक १९/०२/२०२३ रविवार शासकीय सुटी** | |
| अनु. क्रमांक १३२१ ते १५८७ वर नमुद उमेदवार | सोमवार दिनांक- २०/०२/२०२३ चे सकाळी- ०७:४५ वा. |

ASate

( डॉ.अश्विनी पाटील)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे करिता

प्रति,

पोलीस निरीक्षक, सायबर गुन्हे शाखा, नागपुर शहर

२/- त्यांनी वर नमुद प्रसिध्दीपत्रक नागपुर शहर पोलीस आयुक्तालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.